# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६६४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/१०/२०१६

**१) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु व एक जखमी. :–**

दिनांक १०/१०/२०१६ चे १८.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन ओव्हरटेक करण्याचे प्रयत्नात फिर्यादी चे टॅक्टर क्र. एमएच ३६ जी ८२९९ चे ट्रालीला धडक देवुन टॅक्टर ट्रॉलीचे मागे येणारी मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ५६० चा चालक शिवशंकर धुर्वे रा. धारगाव व ट्रक मधील बसलेला मधुकर दुधवळे यांचे मरणास व ट्रॅक्टर वरील हमाल सिताराम फुलसुंगे व स्वतः जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रविद्र आनंदराव मेश्राम वय ३१ वर्ष, रा. डोडमाझरी यांचे तोंडी व डॉ. मेमो व एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. इंगोले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन मारण्यापिटण्याची धमकी दिली . :–**

दिनांक १०/१०/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादी प्रभातकुमार शामसुंदर मिश्रा वय ४२ वर्ष, रा. खातरोड भैय्याजी नगर भंडारा याला आरोपीने फोनवर आणि पोस्टे भंडाराचे बाजुला मेन रोडवर आमोरा समोर खुदको बहोत गुंडा समजता है पती– पत्नीचे भांडण सोडविण्यास आलास असे म्हणुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) औषधउपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. ०९/१०/२०१६ रोजी १३.१५ वा. दर. यातील मृतक नरेश सहादेव बनकर वय ४० वर्ष, रा. चुल्हाड हा आपल्या शेतातील धानावर औषध फवारनी करुन घरी परत येवुन उलटया करु लागल्याने त्यास उपचारा करता सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०९/१०/२०१६ चे १३.१५ वा. मरण पावल्याने पो. स्टे. तुमसर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र पो.स्टे. सिहोरा येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. घारपांडे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०९/१०/२०१६ रोजी २३.०० वा. ते १०/१०/२०१६ चे ०३.००वा. दर. यातील मृतक सहादेव परसराम बोंद्रे वय ६० वर्ष, रा. पारडी हा आपल्या घराच्या छतावरचे कॉलमला नॉयलॉन दोरीने बांधुन गळफास लावुन स्लॅप वरुन घराच्या मागील बाजुस कुदुन गळफास लावुन मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी महादेव परसराम बोंद्रे वय ५० वर्ष, रा. पारडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहे.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १०/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ११० प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व ईतर वाहनांवरती १०४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.